नैसर्गिक आपत्तीग्रस्त व्यक्तींचे घर, गुरांचा गोठा, शेत व विहीर यांकरीता आवश्यक गौणखनिजांच्या वापराकरिता स्वामित्वधनातून सूट देणेबाबत....

<u>महाराष्ट्र शासन</u>

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः गौखनि १०/०८१९/प्र.क्र.११३ /ख-२

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
तारीख: ३० ऑगस्ट, २०१९.

<u>वाचा :-</u>

१) शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र. गौखनि १०/०२१५/ प्र.क्र.९२/ख, दिनांक १२/०१/२०१८.
२) शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र. गौखनि १०/०२१५/ प्र.क्र.९२/ख, दिनांक १७/११/२०१८.

<u>प्रस्तावना:-</u>

राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये सद्यस्थितीत पुरग्रस्त परिस्थिती निर्माण झालेली आहे. तसेच राज्यात अनपेक्षितपणे भूकंप व चक्रीवादळ यांसारख्या अनेक नैसर्गिक आपत्ती निर्माण होत असतात. यामुळे बाधित झालेल्या आपदग्रस्तांचे घर, गुरांचा गोठा, शेत व विहीर यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असते. त्यामुळे त्यांचे दुरुस्तीसाठी/पुनर्बांधणीसाठी माती, दगड, मुरुम व वाळूची आवश्यकता असते. संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन अधिसूचना, दि. १२.०१.२०१८ अन्वये स्वामित्वधन न आकारता घर, शेत व विहीर यांच्या प्रयोजनाकरीता माती, दगड, कंकर, खडक किंवा मुरुम याकरीता दोन ब्रासपर्यंत मर्यादा आहे.

तसेच, संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन अधिसूचना, दि. १७.११.२०१८ अन्वये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरीताच गृहनिर्माण योजनेअंतर्गत स्वतःच्या घराच्या बांधकामासाठी स्वामित्वधन न आकारता पाच ब्रास वाळू काढण्यास परवानगी आहे. सद्यस्थितीत राज्यातील पुरग्रस्त परिस्थिती पाहता, अशा प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीने बाधित झालेल्या व्यक्तींचे घर, गुरांचा गोठा, शेत व विहीरी यांचे दुरुस्तीसाठी/पुनर्बांधणीकरीता पाच ब्रास पर्यंत वाळू वापरण्यास स्वामित्वधनातून सूट देणे तसेच स्वामित्वधन न आकारता माती, दगड, कंकर, खडक किंवा मुरुम याकरीता दोन ब्रासपर्यंत असलेली मर्यादा पाच ब्रासपर्यंत वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

राज्यामध्ये अनपेक्षितपणे उद्भवणारे पुर, भूकंप यांसारख्या नैसर्गिक आपत्तीने बाधित झालेल्या आपदग्रस्तांना त्यांचे घर, गुरांचा गोठा, शेत व विहीर यांचे दुरुस्ती/पुनर्बांधणीसाठी संबंधित तालुक्याच्या तहसीलदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या ठिकाणाहून महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) नियम, १९६८ च्या नियम २ च्या अनुषंगाने पाच ब्रासपेक्षा अधिक नाही एवढे गौण खनिज (माती, दगड, कंकर, खडक किंवा मुरुम); आणि महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे

उत्खनन व ती काढणे) नियम, १९६८ च्या नियम ३ च्या अनुषंगाने पाच ब्रासपेक्षा अधिक नाही एवढ्या वाळूचे उत्खनन व वाहतूकीकरीता स्वामित्वधन आकारणीतून सूट देण्यात येत आहे.

२. याबाबत, महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) नियम, १९६८ मध्ये स्वतंत्रपणे आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३३२/व्यय-९/२०१९, दि. १९/०८/२०१९ अनुसार दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८३०१७११२४८३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAMESH SHIVAJI CHAVAN

Digitally signed by RAMESH SHIVAJI CHAVAN
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=7ada4e8fa11566f3b9c9f7b5fa123945d54f8e3d5b09d05bedfa09b97ee45cad,
postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=eb458b05e05ee27f435bd399537405d44e1c88021cf038b060ac10b9d8fb8787,
ou=REVENUE, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAMESH SHIVAJI CHAVAN
Date: 2019.08.30 17:21:39 +05'30'

(रमेश चव्हाण)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन मलबार हिल मुंबई. (पत्रान्वये)
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री (महसूल) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा. राज्यमंत्री (महसूल) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई.
७) प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर.
८) सर्व विभागीय आयुक्त.
९) सर्व जिल्हाधिकारी.
१०) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
११) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) सर्व उपविभागीय अधिकारी.
१३) सर्व जिल्हा खनिकर्म अधिकारी
१४) सर्व तहसिलदार.
१५) महालेखापाल-१, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), मुंबई.
१६) महालेखापाल-२, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), नागपूर.
१७) सर्व मंत्रालयीन विभाग.
१८) सर्व कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१९) निवडनस्ती "ख" कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.